## नियमीत दिवाणी दावा क्र.५६/२०२२ मधील नि.क्र.१९ खालील आदेश
## ( राजकुमार –वि– धनपाल )

१. प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश ६ नियम १७ प्रमाणे दिला आहे.

२. वादीचे अर्जामधील कथन की, त्याने प्रतिवादीच्या विरुध्द प्रस्तुतचा दावा घोषित करण्याबाबत दाखल केला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता वादीच्या विधीज्ञांना असे निदर्शनास आले की, दाव्याच्या मागणी रकान्यामध्ये चुकीने विक्रीपत्र रद्द करण्याबाबत मागणी करण्याचे राहून गेले आहे. त्यामुळे वादीला प्रस्तुत दाव्यात मागणी रकान्यात जाहिरनामा नंतर ''विक्रीपत्र रद्द करण्याबाबतचा दावा'' हा मजकुर नमुद करणे आहे. त्याचप्रमाणे वादीला दाव्यातील परिच्छेद क्र.८ व क्र.७ आणि विनंती रकान्यातील अनुक्रमांक (ब) ओळ क्र.४ मध्ये देखील दुरुस्ती करून या अर्जात नमुद केलेला मजकुर टाकणे आहे. सदरच्या दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपात बदल होत नसून प्रतिवादीवर अन्याय देखील होत नाही. शेवटी, वादीने प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात यावा अशी विनंती केली.

३. सदर अर्ज दाखल झाल्यानंतर प्रतिवादीचे म्हणणे मागविण्यात आले. प्रतिवादीच्या विधीज्ञांनी सदर अर्जावर आपले म्हणणे सादर करून असे नमुद केले की, सदरचा अर्ज कायद्याच्या तरतुदीच्या विसंगत असून तो मंजूर केल्यास दाव्याच्या स्वरुपावर त्याचा विपरीत परिणाम होवून दाव्याचे स्वरुप बदलण्याची दाट शक्यता आहे. अशा परिस्थीत वादीला त्याचा संपूर्ण दावा काढून घेवून नव्याने दावा दाखल करणे आवश्यक आहे. शेवटी त्यांनी अशी विनंती केली की, सदरचा अर्ज खारिज करण्यात यावा.

४. अर्ज व अभिलेखाचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादीच्या सुविज्ञ विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. सदर अर्जाच्या अनुषंगाने प्रस्तुत दाव्याचे व अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी याने प्रतिवादी विरुध्द जाहिरनामा मिळण्याबाबतचा दावा दाखल केला आहे. प्रस्तुतच्या दाव्यात दिनांक ०८/०२/२०१० रोजीच्या विक्रीपत्राचा देखील उल्लेख करण्यात आला आहे. सदर विक्रीपत्राची प्रमाणित प्रत

This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHBH040007492022/truecopy/order-1.pdf

www.ecourtsindia.com



वादीने दस्ताऐवजाची यादी (नि.क्र.४) सोबत दाखल केली आहे. उभय पक्षाच्या युक्तीवादाच्या अनुषंगाने प्रस्तुत अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की,वादीला सदरचे विक्रीपत्र रद्द करण्याबाबतची दाद प्रस्तुत दाव्यामध्ये समाविष्ट करावयाची आहे. त्या अनुषंगाने प्रस्तुतचा अर्ज देण्यात आलेला आहे.

**५.** एकंदरीत अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदरचे विक्रीपत्र बाबतच वादीने घोषणा करून मिळण्याबाबत दावा दाखल केला आहे. याच दाव्यात वादीला सदर विक्रीपत्र रद्द करून मिळण्याबाबतची मागणी समाविष्ट करावयाची आहे. केवळ सदरची मागणी समाविष्ट करावयाची आहे यामुळे संपूर्ण दावाच वापस घेवून पून्हा नव्याने दावा दाखल करावा हे प्रतिवादीचे कथन स्वीकाहार्य नाही. सदरचा अर्ज मंजुर केल्याने दाव्याच्या स्वरुपात कश्या प्रकारे बदल होईल याबाबत प्रतिवादीने काहीएक नमुद केले नाही. उभय पक्षामधील संपूर्ण वाद एकाच खटल्यामध्ये निकाली काढणे अपेक्षित असून त्याकरीता त्यांना वेगवेगळे खटले दाखल करावे लागणे अपेक्षीत नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्जामध्ये केलेली विनंती मान्य करणे योग्य राहिल. सदरची मागणी मंजुर केल्यास दाव्याच्या स्वरुपात कोणतेही बदल होणार नाही.

**६.** त्याचप्रमाणे या ठिकाणी मी हे स्पष्टपणे नमुद करू इच्छीतो की जरी सदरचा अर्ज मंजुर करण्यात येवून सदर विक्रीपत्राबाबतची मागणी दाव्यात नव्याने समाविष्ट करण्याची परवानगी देण्यात येत असली तरी सदरच्या विक्रीपत्राबाबत मुदत कायदा, १९६३ मधील तरतुदीची पुर्तता करणे वादीवर बंधनकारक राहिल. त्याचप्रमाणे सदर विक्रीपत्रामधील मिळकतीच्या मुल्यानुसार दाव्याचे मुल्य दुरुस्त करून त्यावर विहित न्यायालयीन शुल्क भरणे देखील वादीवर बंधनकारक आहे. त्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश ६ नियम १७ मधील नमुद तरतुदीनुसार सदरचे अर्ज मंजुर करणे योग्य राहिल. करीता करिता मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१) अर्ज नि.क्र.१९ मंजूर करण्यात येत आहे.

This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHBH040007492022/truecopy/order-1.pdf

२) वादीने या अर्जात नमुद केल्याप्रमाणे त्याचे अर्ज (नि.क्र.१९) मध्ये दुरुस्ती सदर आदेशापासून १४ दिवसांचे आत करावी.

३) वादीने विक्रीपत्रामधील मिळकतीच्या मुल्यानुसार दाव्याचे मुल्यांकन करून योग्य ते न्यायालयीन शुल्क भरावे.

४) दोन्ही बाजूकडील पक्ष, त्यांचे विधीज्ञ, या न्यायालयातील संबंधीत कारकुन आणि सहाय्यक अधिक्षक यांनी सदर आदेशाची नोंद घेवून अंमलबजावणी करावी.

दिनांक – ०२/०२/२०२४

(एफ. के. सिद्दीकी),
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
लाखनी

This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHBH040007492022/truecopy/order-1.pdf
www.ecourtsindia.com

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. file Order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | M.R. Gate, |
| Court Name | : | Jt. Civil Judge, Jr. Court. Lakhani. |
| Date | : | 02/02/2024 |
| Order signed by the Presiding Officer on | : | 02/02/2024 |
| Order uploaded on | : | 03/02/2024 |

XXXX

डिजीटल की ची वैधता संपल्यामुळे आदेशावर डिजीटल सही करण्यात आली नाही.

This is a True Copy of the Court Records Online. Authenticated @ districts.ecourtsindia.com/cnr/MHBH040007492022/truecopy/order-1.pdf

www.ecourtsindia.com